आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे सावकारीच्या विळख्यात सापडलेल्या किडणी प्रकरणातील रोशन कुळे यांना दिलासा !

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधीतून रोशन कुळे यांना ५ लाखांची मदत मंजूर

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लक्ष रुपये मंजूर केल्याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मानले आभार

चंद्रपूर - चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रोशन शिवदास कुळे यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटाला अखेर दिलासा मिळाला आहे. सावकारीच्या जाचामुळे आणि कर्जाच्या विळख्यात अडकून किडणी विक्रीसारख्या अत्यंत वेदनादायी घटनेला सामोरे जावे लागलेल्या रोशन कुळे यांच्या मदतीसाठी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

रोशन शिवदास कुळे यांची सावकारी कर्जामुळे आर्थिक अवस्था अत्यंत बिकट झाली होती. त्यांच्या शेतजमिनी सावकारांकडे गहाण असल्याने संपूर्ण कुटुंब अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर रोशन कुळे यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात येत आपली कैफियत मांडली होती. त्यांच्या कुटुंबाची व्यथा ऐकल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी तात्काळ मुख्यमंत्री

देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करत या प्रकरणात मदत देण्याची आग्रही मागणी केली होती.

यासंदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी शासनाकडे अधिकृत पत्रव्यवहार करत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि संबंधित विभागांशी समन्वय साधत हे प्रकरण संवेदनशीलतेने मांडले. अखेर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपये मंजूर करण्याचा निर्णय घेतला.

या मदतीमुळे संकटाच्या अंधारात सापडलेल्या कुळे कुटुंबाला मोठा मानसिक आणि आर्थिक आधार मिळाला आहे. अनेक दिवसांपासून सावकारीच्या जाचाने, कर्जाच्या ओझ्याने आणि भविष्यातील चिंतेने खचलेल्या या कुटुंबासाठी ही मदत म्हणजे नव्या आशेचा किरण ठरली आहे. "आमच्या आयुष्यातील अत्यंत कठीण आणि वेदनादायी काळात आमचे दुःख समजून घेत मदतीसाठी धावून येणारे नेतृत्व म्हणजे आ. सुधीर मुनगंटीवार. त्यांच्या संवेदनशील भूमिकेमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला," अशा शब्दांत कुळे कुटुंबीयांनी आपल्या भावना व्यक्त करत आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले आहे.

दरम्यान, येत्या १९ तारखेला चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते रोशन कुळे यांना ५ लक्ष रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या प्रकरणात संवेदनशील भूमिका घेत विशेष मदत मंजूर केल्याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 2482/ए/प्रिल/26

दिनांक : 07.04.2026

प्रमुख मु.स.नि.कक्ष
पुढील कार्यवाही
देण्यात यावे

प्रति,

मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणविस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई -32

वंदे मातरम् !

विषय : श्री. रोशन शिवदास कुळे यांना मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत रू. 5 लक्ष अर्थसहाय्य मंजुर करण्याबाबत.

संदर्भ :
1. माझे आपणास सादर पत्र क्र. 1267/मार्च/2026 दिनांक 01.03.2026
2. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र दिनांक 01.04.2026
3. मा. कक्ष अधिकारी तथा सह कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक 2.4.2026

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यातील नुकतेच गाजलेल्या सावकारी जाचामुळे किडणी विक्रीच्या घटनेतील पिडीत श्री. रोशन शिवदास कुळे यांची सावकारी कर्जामुळे तसेच शेतजमीन देखील गहाण असल्यामुळे आर्थीक अवस्था अतिशय बिकट आहे. त्यांचे याच सावकारी जाचातुन व त्यांचेवर दबाव टाकुन त्यांना कर्जातुन मुक्त होण्यासाठी स्वतःची किडणी विकण्यास तथाकथीत सावकारांनी भाग पाडले. या प्रकरणातील आरोपींवर गुन्हे दाखल असून स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.
श्री. रोशन शिवदास कुळे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मी आपणास संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये सदर प्रकरणी विशेषबाब म्हणुन त्यांना मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत रू. 5 लक्ष अर्थसहाय्य मंजुर करण्याबाबत विनंती केली होती. याबाबत मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये आपणाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. (प्रस्तावाची प्रत संलग्न)
त्याअनुषंगाने श्री. रोशन शिवदास कुळे यांना विशेषबाब म्हणुन मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत रू. 5 लक्ष अर्थसहाय्य मंजुर करण्याबाबतच्या योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :
1 मा. कक्ष अधिकारी तथा सह कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई - 400 032
2 मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
3 श्री. रोशन शिवदास कुळे, रा. मिंथुर ता. नागभिड जि. चंद्रपूर मो.नं.9623843080



Scanned with OKEN Scanner

इमेल-so6.cmo@maharashtra.gov.in
फोन नं- ०२२- २२०२००४५/४६

क्रमांक : मुमंनि-१०२६/चंद्रपूर/प्र.क्र.२५/निधी कक्ष/1020

**मुख्यमंत्री सचिवालय**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

सत्यमेव जयते

दिनांक : 07 MAY 2026

प्रति,

**जिल्हाधिकारी, चंद्रपूर.**

**विषय**- : मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य.
**संदर्भ** :- आपले पत्र क्र.कावि/सहा.मह.अधि./नै.आ./टे-३/२०२६/१२३, दि.०१.०४.२०२६

**महोदय,**

**श्री.रोशन शिवदास कुळे,** रा.मिंथुर, ता.नागभिड, जि.चंद्रपूर यांची सावकारी जाच व किडणी विक्री प्रकरणामुळे आर्थिक परिस्थिती बिकट झाली असल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर प्रकरणी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून **रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त)** इतके अर्थसहाय्य मंजूर केले आहे.

२. सदरहू मंजूर अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या असलेल्या मुंबई शाखेतून आपल्या नावे, स्टेट बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर, जतपुरा गेट शाखा, **बँक खाते क्र. ३०५६८४२२४०२** मध्ये परस्पर वर्ग करण्यात आले आहे.

३. उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपण पाठविलेल्या अहवालानुसार सदर प्रकरणाची आवश्यक ती संपूर्ण पडताळणी करुन अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे. तसेच अर्थसहाय्य मंजूर प्रयोजनाकरीता वापरण्यात आल्याबद्दल विनियोगाचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. श्री.कुळे यांना अर्थसहाय्य प्राप्त झाल्याबद्दल महसूल मुद्रांकित पावती या सचिवालयास सत्वर पाठवावी.

४. निधीच्या रक्कमेचा विनियोग न झाल्यास सदर रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या **बँक खाते क्र.१०९७२४३३७५१** स्टेट बँक ऑफ इंडिया, फोर्ट मुंबई, मुख्य शाखा, या खात्यात तात्काळ वर्ग करुन या सचिवालयास तसे अवगत करावे. कृपया अर्थसहाय्य प्राप्त झाल्याची पोच पावती द्यावी.

आपला,

**(शरद घावटे)**
**सह कक्ष प्रमुख तथा**
**कक्ष अधिकारी**

**प्रत**- श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.,
'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र)